**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि.**

**दिनांक : 09.06.2024** **रविवार**

---

**ठळक बातम्या**

1. **नरेंद्र मोदी यांचा आज संध्याकाळी पंतप्रधानपदी शपथविधी, सोहोळ्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्थेसह नवी दिल्ली सज्ज,**
2. **आगामी विधानसभा निवडणुकांसाठी निर्धारानं कामाला लागण्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं भाजपा कार्यकर्त्यांना आवाहन,**
3. **नीट परीक्षा संपूर्ण देशभरात पारदर्शकरित्या पार पडली असल्याचा राष्ट्रीय परीक्षा परिषदेचा निर्वाळा,**
4. **दिव्यांगांसाठी कार्यरत सक्षम संस्थेच्या राष्ट्रीय अधिवेशनाचं पुण्यात उद्घाटन,**

**आणि**

5. **राज्यात मॉन्सूनची आगेकूच, रत्नागिरी, सिंधुदुर्गमध्ये पुढील दोन दिवस अतिमुसळधार पावसाचा इशारा.**

**शपथविधी**

भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू नरेंद्र मोदी यांना आणि नवीन मंत्रिमंडळाला पद आणि गोपनीयतेची शपथ देतील. संध्याकाळी सव्वासात वाजता राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात हा समारंभ होणार असून त्यासाठी देशभरातून आठ हजार लोकांना निमंत्रित करण्यात आलं आहे, अशी माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिली आहे. या शपथविधी समारंभाला भारताच्या शेजारी राष्ट्रांचे महत्वाचे नेते उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी दिली. श्रीलंकेचे राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे, मालदीवचे राष्ट्रपती डॉक्टर मोहम्मद मुइज्जू, सेशेल्सचे उपराष्ट्रपती अहमद अफीफ, बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसीना ही नेतेमंडळी कालच नवी दिल्लीमध्ये दाखल झाली आहेत. नेपाळचे पंतप्रधान पुष्पकमल दहल प्रचंड, मॉरीशसचे पंतप्रधान प्रविंद कुमार जगन्नाथ आणि भूटानचे पंतप्रधान शेरिंग तोबगे हेही उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, या शपथविधी समारंभानंतर या नेत्यांची राष्ट्रपती भवनात बैठक होणार असून रात्री राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्नेहभोजन आयोजित केलं आहे. शपथविधी समारंभाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी सुरक्षा व्यवस्था कडक केली आहे. नवी दिल्ली नो फ्लाईंग झोन घोषित करण्यात आला असून कोणत्याही प्रकारचे ड्रोन, पॅराग्लायडर्स, हवाई तरंगते ग्लायडर्स किंवा अशा प्रकारची उपकरणं हवेत उडवायला बंदी केली आहे. ही बंदी दहा तारखेपर्यन्त कायम असणार आहे.

आकाशवाणी दिल्लीवरुन शपथग्रहण सोहोळ्याचं थेट वर्णन संध्याकाळी पावणेसात वाजल्यापासून एफएम गोल्ड, इंद्रप्रस्थ आणि आकाशवाणी लाईव न्यूज 24X7 या वाहिन्यांवरुन करण्यात येईल.

**कॉँग्रेस बैठक**

काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना विरोधी पक्षनेता बनवण्याच्या प्रस्तावाला काल कॉंग्रेस कार्यकारी समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते के.सी. वेणुगोपाल यांनी बैठकीनंतर पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. कॉंग्रेस संसदीय पक्षनेतेपदी सोनिया गांधी यांची निवड करण्यात आली आहे.

**भाजपा मुंबई बैठक**

लोकसभा निवडणुकांमधील भाजपाच्या विजयात सिंहाचा वाट नाही, ही खंत असली तरी ही कसर विधानसभा निवडणुकांमध्ये भरून काढण्याच्या निर्धारानं कामाला लागा, त्यासाठी नवी रणनीती तयार असून महायुतीमध्ये समन्वय ठेवून काम करा, असं आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल भाजपा कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना केलं. भाजपा विधिमंडळ गटाची बैठक काल मुंबईत झाली. त्यामध्ये ते बोलत होते. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई भाजप अध्यक्ष आमदार आशिष शेलार, राज्यातील भाजप आमदार आदी बैठकीला उपस्थित होते.

**नसीम खान**

नव्यानं तयार होत असलेल्या एनडीए सरकारमधील घटक पक्ष तेलुगु देसमनं मुस्लीम समाजाला आरक्षण देण्यास कटिबद्ध असल्याचं स्पष्ट केलं आहे. आंध्र प्रदेशात मुस्लीम समाजाला आरक्षण दिले जाऊ शकत असेल तर त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही ते दिलं पाहिजे, अशी मागणी माजी मंत्री आणि प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष नसीम खान यांनी केली आहे. ते काल मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

**जरांगे**

सगेसोयरे कायद्यासाठीचा अध्यादेश सरकारनं काढला होता. त्याची तातडीनं अंमलबजावणी करावी या मागणीसाठी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी इथं कालपासून आमरण उपोषण सुरू केलं आहे.

**हे प्रादेशिक बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून देण्यात येत आहे...**

**नीट**

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेतलेली राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा अर्थात नीट संपूर्ण देशभरात पूर्णपणे पारदर्शकरित्या पार पडली असल्याचा निर्वाळा राष्ट्रीय परीक्षा परिषद

अर्थात एनटीएनं दिला आहे. एनटीएचे महासंचालक सुबोधकुमार सिंग यांनी काल नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या परीक्षेची कोणतीही प्रश्नपत्रिका फुटली नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. प्रश्नपत्रिका उशिरा मिळालेल्या विद्यार्थ्यांना एकूण गुणांच्या प्रमाणानुसार आणि तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार वाढीव गुण देण्यात आले आहेत. ज्या सहा परीक्षा केंद्रातील एक हजार सहाशे विद्यार्थ्यांचा चुकीच्या प्रश्नपत्रिकेच्या वितरणामुळे वेळ वाया गेला असल्याच्या तक्रारी झाल्या, त्यांचं निवारण करण्यासाठी एनटीएनं उच्चस्तरीय समिती स्थापन केली असल्याचं सिंग यांनी सांगितलं. यावर्षी ५ मे रोजी ही परीक्षा घेण्यात आली आणि त्याचा निकाल या आठवड्यात ४ जूनला जाहीर झाला होता.

**पटोले**

राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील जनतेला तातडीनं मदत द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. या मागणीचं निवेदन त्यांनी काल राज्यपाल रमेश बैस यांच्याकडे सादर केलं. कोरडवाहू शेतीला एकरी २५ हजार रूपये, बागायती शेतीला ५० हजार रूपये आणि फळबागांना एकरी १ लाख रुपये मदत द्यावी, तसंच जनावरांसाठी चारा, पिण्याचे पाणी, बियाणांचा पुरवठा या सुविधा पुरविण्याचे निर्देश राज्य सरकारला द्यावेत, अशी मागणीही पटोले यांनी केली.

**सक्षम**

'सक्षम' म्हणजेच समदृष्टी, क्षमताविकास आणि संशोधन मंडळ या दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी वाहिलेल्या राष्ट्रीय संस्थेच्या त्रैवार्षिक राष्ट्रीय अधिवेशनाचं उद्घाटन काल पुण्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांच्या हस्ते करण्यात आलं. यावेळी अयोध्या इथल्या श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज उपस्थित होते. पुण्यातील महर्षी कर्वे संस्थेत दोन दिवस हे अधिवेशन सुरू राहणार आहे. समाजानं दिव्यांग व्यक्तीमध्ये काय नाही, यापेक्षा काय आहे याचा विचार करून त्यांना प्रोत्साहन दिल्यास ते देशासाठी मोठे योगदान देऊ शकतील, असं प्रतिपादन होसबाळे यांनी केलं. या अधिवेशनाला देशभरातून ५०० जिल्ह्यातील १५०० प्रतिनिधी उपस्थित आहेत.

**पालखी**

संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांच्या ठिकाणी सर्व आवश्यक ती कामं करण्याचे आणि पालखी मार्गावरील अतिक्रमणं काढण्याचेही आदेश पुणे महापालिकेचे आयुक्त राजेंद्र भोसले यांनी दिले आहेत. पालख्यांचं आगमन पुणे शहरात ३० जून रोजी होत आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी पालखी मार्गांची पाहणी केली.

**लोकल**

पुणे-लोणावळा रेल्वे मार्गावर तळेगाव ते कामशेत दरम्यान आज दुरुस्तीचं काम करण्यात येणार असल्यानं पुणे लोणावळा दरम्यान लोकलच्या १० फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. तर काही गाड्या उशिरानं धावणार असल्याची माहिती मध्य रेल्वेनं दिली आहे.

**मिनी ट्रेन**

नेरळ ते माथेरान मिनीट्रेन कालपासून बंद करण्यात आली आहे. ती 15 ऑक्टोबरपर्यंत बंद राहील, असं मध्य रेल्वेच्या पत्रकात म्हटलं आहे. दरवर्षी पावसाळ्यात ही गाडी बंद ठेवण्यात येते. माथेरानमध्ये दरवर्षी मोठा पाऊस पडतो, त्यातून दरडी कोसळण्याचा धोका लक्षात घेऊन ही गाडी बंद ठेवली जाते. ही गाडी बंद असली तरी अमन लॉज ते माथेरान ही शटल सेवा सुरू राहणार आहे.

**पाऊस**

राज्याच्या विविध भागात काल पावसानं हजेरी लावली. पुणे शहर आणि परिसरात संध्याकाळी जोरदार पाऊस झाला. अवघ्या दीड ते दोन तासांत पुणे शहरात ६७ पूर्णांक ४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. त्यामुळे जनजीवन विस्कळित झालं. या पूर्व मोसमी पावसामुळे पुणेकरांची दाणादाण उडाली.

नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसानं ब्राम्हणपुरी गावच्या केळीच्या बागांचं नुकसान झालं आहे. तोडणीला आलेल्या केळीच्या घडांसहीत झाडं कोलमडून पडली आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यात गेले दोन दिवस पावसाला फारसा जोर नव्हता. काल संध्याकाळपासून चांगला पाऊस सुरू असून रत्नागिरी तालुक्यात अनेक ठिकाणी संध्याकाळनंतर संततधार सुरू आहे.

तळकोकणात मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर धडकलेल्या पावसानं सिंधुदुर्ग जिल्हयात जोरदार हजेरी लावली. आज जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. नाशिक जिल्ह्यात सुरगाणा तालुक्यातील तोरंगण इथं वीज कोसळून एकाचा मृत्यू झाला.

**हवामान**

नैर्ऋत्य मोसमी पावसाची आगेकूच सुरु असून राज्यात मुंबईसह इतरत्र मान्सूनच्या आगमनासाठी परिस्थिती अनुकूल आहे. कोकणात विशेषतः रत्नागिरी, सिंधूदुर्ग इथं पुढील दोन दिवसांत अतिवृष्टीचा अंदाज आहे. पुणे परिसरात घाटमाथ्यावर दोन दिवस जोरदार पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेने वर्तविला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**